|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

**विद्यार्थी विकास विभाग**



जा.क्र. कबचौउमवि/14/रोव्यकाशा-62/ 21/2026 दि. 27/01/2026

**प्रति,**
**मा.प्राचार्य / मा. संचालक,**
**धुळे जिल्हयातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/ मान्यता प्राप्त परिसंस्था**
**यांना -**

**विषयः-** **धुळे जिल्हास्तरीय रोजगार व व्यवसाय मार्गदर्शन (दोन दिवसीय) कार्यशाळे करीता विद्यार्थी पाठविण्याबाबत.....**

**संदर्भः-** विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि/14/वि.वि/144/2025, दि.15/10/2025 चे पत्र.

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरीता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शने आयोजित केली जातात.

प्रस्तुत हेतूने विद्यार्थ्यांमध्ये रोजगार आणि व्यवसाय उपक्रमांचा विचार रुजवावा, नोकरीवरच अवलंबून न राहाता विविध रोजगार व व्यवसाय करण्याकरीता त्यांना प्रशिक्षीत करणे व त्यांनी आपल्या समवयस्क सहकाऱ्यांपर्यंत हा संदेश पोहोचवावा या उद्देशाने शैक्षणिक वर्ष 2025-26 मधील **धुळे जिल्हास्तरीय रोजगार व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे** आयोजन **दि. 11 व 12 फेब्रुवारी 2026** या कालावधीत **कबचौउमवि संचलीत महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे यांच्यावतीने मा.ध.पालेशा वाणिज्य महाविद्यालय,धुळे** येथे आयोजित करण्यात येत आहे.

सदर कार्यशाळेत आपल्या महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था मधील खालील निकषानुसार **6 विद्यार्थी (3 विद्यार्थी व 3 विद्यार्थिनी)** निवड करुन पाठवावेत, ही विनंती.

* कार्यशाळेत सहभागी होणारा विद्यार्थी गुणवत्ताधारक, आज्ञाधारक, कुशल, बोलका निर्णय घेणारा, रोजगार व्यवसायाची माहीती आणि आवडअसणारा व नेतृत्व गुण सांभाळणारा असावा.
* सदर विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात (सन 2025-26) नियमित शिक्षण घेणारा असावा. त्याच्या/तिच्याकडे अद्यावत (प्राचार्य/संचालक यांच्या सही व शिक्का असलेले) ओळखपत्र असावे.
* सदर विद्यार्थी-विद्यार्थिनीने यापूर्वी विद्यापीठ/ राज्य /राष्ट्रीय स्तरावरील प्रस्तुत कार्यशाळेत सहभाग घेतलेला नसावा.

कृपया निकषानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवास, चहा अल्पोहार व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत निःशुल्क केली जाईल. मात्र त्यांचा येण्याजाण्याचा प्रवासखर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावा.

**कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना :-**

* सदर कार्यशाळा उद्घाटन सोहळा दि. 11 **फेब्रुवारी 2026** रोजी सकाळी 9.30 वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकाळी 9.00 वाजेपर्यंत कार्यशाळा स्थळी उपस्थित राहाणे अगत्याचे आहे.
* कार्यशाळा कालावधी 2 दिवसांचा असल्याने विद्यार्थ्यांनी गरजेनुसार आवश्यक साहित्य, पाणी बॉटल, पांघरुण, गरम कपडे, बॅटरी, कापडी बुट-मोजे तसेच गरजेनुसार आवश्यक औषधी सोबत आणावी. कृपया विद्यार्थ्यांनी मौल्यवान वस्तू / मोबाईल वा गरजेपेक्षा अधिक रक्कम सोबत आणू नये.

..2..

* कार्यशाळेला केवळ 3 विद्यार्थी व 3 विद्यार्थिनी यांचीच निवड करून त्यांना पाठवावे. निर्धारीत संख्येपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. कार्यशाळेत 3 विद्यार्थी व 3 विद्यार्थिनी येणे आवश्यक आहे. जर विद्यार्थिनी ऐवजी 6 विद्यार्थी पाठविलेत तर त्यांचा प्रवेश नाकारला जाईल (फक्त मुलींचे महाविद्यालय / परिसंस्था वगळून). तसेच महाविद्यालयातून गटप्रमुख म्हणून प्राध्यापकांना पाठवू नये, याची कृपया नोंद घ्यावी.
* निवड करण्यात आलेला विद्यार्थी हा/ही महाविद्यालयातील नियमित प्रवेशित असावा/ असावी व त्याच्या/ तिच्या कडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृपया स्पर्धेसाठी पाठवू नये.
* सांस्कृतीक कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कला सादरीकरणासाठी पांरपारिक वेशभूषा, वाद्ये व आवश्यक साहित्य सोबत आणावे.
* कार्यशाळा कालावधीत मित्र, मैत्रिण, अथवा स्थानिक नातेवाईक यांना भेटीसाठी बोलविता येणार नाही. तसेच गैरवर्तन आढळल्यास विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून तात्काळ परत पाठविण्यात येईल.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक माहिती व संपर्कासाठी -**

1. मा.डॉ.संजय ढोढरे, कार्यकारी संचालक, कबचौउमवि संचलीत महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे.
   भ्रमणध्वनी क्र. 9822533642
   ई-मेल - dhulemgpc@gmail.com

**स्थळ :- मा.ध.पालेशा वाणिज्य महाविद्यालय,धुळे**

उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुनःश्च कळवितो की, सदर कार्यशाळेत निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि. 09/02/2026** पर्यंत **मा. कार्यकारी संचालक, कबचौउमवि संचलीत महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे**.यांना dhulemgpc@gmail.com या ई-मेल वर व सर्व दस्तऐवज विद्यार्थ्यांसोबत पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वंयवृत्त विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेत स्थळावर भेट दिल्यास Home page वर Circular Link आणि Students Development मध्ये उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

25-1-2026

(डॉ. जयेंद्र दि.लेकुरवाळे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

* **सोबत** :- विद्यार्थी स्वयंवृत्त
* **प्रत माहितीसाठी :-**
  १. मा. कार्यकारी संचालक, कबचौउमवि संचलीत महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे.
  २. प्रा.विवेकानंद चव्हाण,धुळे जिल्हा समन्वयक,एस.पी.डी.एम.महाविद्यालय,शिरपूर
  ३. मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
  ४. मा.पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव - कृपया सदरच्या परिपत्रकास विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

xpdata/mpp/ Rojgar & vyavsay workshop/2025-26

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

# विद्यार्थी स्वयंवृत्त
# धुळे जिल्हास्तरीय रोजगार व
# व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

1) विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :- ------------------------------------------------------------

2) वर्ग :- -------------

3) जन्म तारीख :- / /

4) शारीरिक दृष्ट्या सक्षम :- होय / नाही

5) रक्त गट :- ------

6) पत्र व्यवहार पत्ता (निवास) :- ---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------

7) भ्रमणध्वनी क्र. :-

8) महाविद्यालय/परिसंस्था/प्रशाळा यांचे नाव :- -----------------------------------------------

9) दूरध्वनी क्र. :- ( )

10) ओळखपत्र क्र. :- -----------------

11) विद्यार्थी विकास उपक्रम सहभाग :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

12) स्वयंपूर्तीने आयोजित कार्यक्रम :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

**विद्यार्थी / विद्यार्थीनीची सही व नाव**

---

## -: पालकाचे संमती पत्र :-

संमती पत्र लिहून देतो/देते की, श्री/सौ./ ------------------------------------------ माझा पाल्य मुलगा/मुलगी नामे ------- --------------------------------- हा/ही रोजगार व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत स्वयंप्रेरणेने व माझ्या सहमतीने सहभागी होत आहे. त्याला/तिला प्रवास व कार्यशाळा सहभाग कालावधीमध्ये शारीरिक दुखापत, मोठी हानी झाल्यास महाविद्यालय/विद्यापीठ यांना जबाबदार धरणार नाही. त्यांच्याकडे कोणताही नुकसान भरपाई व मानहानी दावा करणार नाही.

**पालक/वडील/आई यांचे नाव व स्वाक्षरी**

---

## -: महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा यांचे शिफारस पत्र :-

विद्यार्थी नाव ------------------------------ हा/ही नियमित शिक्षण घेत असून नमूद माहिती नोंदी प्रमाणे बरोबर आहे. विद्यापीठातंर्गत रोजगार व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी शिफारस करीत आहे.

दिनांक :- / /

**विद्यार्थी विकास अधिकारी**
नाव व सही

**प्राचार्य/संचालक**
सही व शिक्का